# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 22/04/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

## छत्रापुर शिवारातील मोहाफुल दारूहातभट्टी धाड, 300 लिटर गावठी दारूसह 4000 लिटर सडवा जप्त पोलिस स्टेशन केळवद ची कार्यवाही

दिनांक 21/04/2021 रोजी पो. स्टे. केळवद येथील ठाणेदार श्री दिलीप ठाकुर यांना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली की, छत्रापुर शिवारातील बोरगाव डॅम जवळ काही इसम हे मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. या खबरे वरुन दिनांक 20/04/2021 चे 09.00 वा. सुमारास ठाणेदार पोनि श्री दिलीप ठाकुर यांनी तांच्या स्टाफसह मौजा छत्रापुर शिवार बोरगाव डॅम येथे पोहचुन छापा घातला असता आरोपी नामे– 1) मुकेश दुर्वेशसिंग मारवाडी वय 34 वर्षे 2) तारासिंग भाउराव पवार 55 वर्षे 3) रतनसिंग रमेश राजपुत वय 36 वर्षे 4) रानी मुकेश मारवाडी वय 30 वर्षे 5) सिता चौकी सोलंकी वय 50 वर्षे 6) पिंकी सत्यपाल पघाने वय 20 वर्षे 7) कविता तारासिंग पवार वय 40 वर्षे सर्व रा. छत्रापुर खदान यांना अटक करण्यात आली असून आरोपी क्र. 8) जगदिश रामाजी अलघरे, 55 वर्ष, रा. छत्रापुर खदान त. सावनेर हा फरार असून याचाशोध घेणे सुरू आहे. आरोपीतांच्या ताब्यातुन घटनास्थळावरून 300 लीटरच्या मोहाफुल दारू, 100 किलो मोहाफुल व 4,000 लीटर रसायन सडवा व इतर साहित्य असा एकुण 4,12,000/– रुपयाचा मुद्देमाल मिळुन जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस सफौ अमरदिप कामठे, पो.स्टे. केळवद यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 65 (बी)(सी)(ई)(एफ), 83 म दा का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा रामराव पवार हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., मा.श्री राहुल माकणीकर, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., मा. श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोनि श्री दिलीप ठाकुर, पोउपनि अर्जुन राठोड, सफौ अरुण गुंठे, पोहवा रविन्द्र डोरले, पोशि धोंडुतात्या देवकत्ते, पोशि सचिन येळकर मनापोशि अश्विनी निकोसे चापोहवा गुणेश्वर डाखोळे यांनी केली.





## जबरी संभोग

पो.स्टे. सावनेर :– दि. 12/04/2021 चे 01.30 वा. सुमारास फिर्यादी यांची 17 वर्षीय पिडीत मुलगी हिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेल्याचे रिपोर्ट पो. स्टे. सावनेर ला रिपोर्ट नोंद आहे.

सदर गुन्हायाचे तपासात फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हि मामाच्या घरी उमरेड येथे मिळुन आली. तिला वैद्यकीय तपासणी करीता पाठविले असता तिने तिचे अल्पवयीन विधी संघर्षग्रस्त बालक वय 17 वर्ष याच्या सोबत तीन वर्षापासुन ओळख असुन गेल्यावर्षापासुन त्यांचेमध्ये प्रेमसंबध असल्याचे सांगीतले. विधी संघर्षग्रस्त बालक याने दि. 17/11/2020 चे 09.30 वा. तिचे बेडरूम येवुन तिला लग्नाचे आमीष दाखवुन, जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. त्यानंतरहि त्यांचे मध्ये तीन–चार वेळा माहे जानेवारी 2021 व माहे फ्रेबुवारी 2021 मध्ये बळजबरीने शारीरिक संबंध केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 363, 376, 376 (2)(एन) भादंवि. सहकलम 3, 4, 5(एल), 6 कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक श्री. सोनाली रासकर 9082196080 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर